


Anusandhanvallari
Vol 2024, No.1
November 2024
ISSN 2229-3388

# बहुध्रुवीय विष्वव्यवस्थेमध्ये भारताचे परराश्ट्रीय धोरणाची भूमिका

संशोधक

विनोद किसन क्षिरसागर

एम.ए., राज्यषास्त्र (महा.) सेट, राश्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

ईमेल – अपदवकोीपतेंहंत13021999 / हउंपसण्बवउ

षिव छत्रपती नगर नागमंदिर, जवळ, गोधनी रेल्वे, नागपूर 441111


मार्गदर्षक

डॉ. संजय एम. अवधूत

एम.ए. (राज्यषास्त्र), एम.फिल., पीएच.डी. पंजाबराव देषमुख कला, वाणिज्य महाविद्यालय (सायम), कॉटन मार्केट,सुभाश रोड, नागपूर

**सारांश –** आंतरराष्ट्रीय संबंध हे वैष्विक स्तरावर समग्र राश्ट्रासाठी राश्ट्रीय गतीविशयक व्यवहारिक संबंध आहे. आंतरराश्ट्रीय संबंधाचा विचार करता भारत हे आपल्या राष्ट्राचे हित साध्य करण्यासाठी आणि वैश्विक स्तरावर महत्व प्राप्त करण्यासाठी परराश्ट्रीय धोरण आखात असतो. भारत आपले हित साध्य करीत असतांना परराश्ट्रीय धोरणांतर्गत षीत युद्धकालीन द्विधृवीय वैश्विक काळात नव्याने स्वातंत्र्य झालेल्या राश्ट्रांबरोबर मिळून स्वतंत्र अषी गुंटनीरपेक्ष ;छवद.छवद ।सपहदउमदज डवअमउमदजद्ध व्यवस्थेच्या माध्यमातून परराश्ट्र धोरण ठरविले होते. षीत युद्धांच्या नंतर विष्वव्यवस्थेमध्ये अमेरिका हा केंद्रीय सत्तेच्या ठिकाणी एकमेव सत्ता उरली जो 20 व्या षतकाच्या अंतिम दषकामध्ये एकध्रुवीय व्यवस्थेचे नेतृत्व कर्ता षक्ती म्हणून उदयास आला. पण येणाऱ्या पाच ते सात वर्शामध्ये एकध्रुवीय विष्वव्यवस्थेला आव्हान देणारे नव – नवीन राश्ट्रे समोर आल्याचे जाणवते. 21 व्या षतकामध्ये एक ध्रुवीयकरणाला टक्कर देत वेगवेगळया क्षेत्रात विविध राश्ट्रे षक्ती प्राप्त करून व तंत्रज्ञानिक मक्तेदारी तसेच वैष्विक बाजारपेठेचा आकार, भौगोलिक महत्व यामुळे स्वतःच्या राश्ट्राला समर्थतता प्राप्त करून दिलेत. या राश्ट्रांमध्ये सोवियत संघ रषियाचे उत्तराधिकारी रषिया हा अमेरिकेला पुन्हा प्रतिकार करणारी सक्षमता प्राप्त केली तर जर्मन, चीन यांनी स्वतःच्या राश्ट्राचा तंत्रज्ञानिक व आर्थिक विकास करत शक्ती संतुलन मध्ये प्रवेश केलेले आहे. याचबरोबर बदलतया विश्वामध्ये विकसित राश्ट्रे आणि विकसनशील राश्ट्रांना देखील महत्व प्राप्त होत राहिले ज्यामध्ये संयुक्त राश्ट्र संघटनेच्या सुरक्षा समितीचे स्थायी सदस्य ब्रिटेन आणि फ्रान्स हे राश्ट्र तर 20 व्या शतकापासून आर्थिक व तंत्रज्ञानिक दृष्ट्याा समृद्ध आहेत. 21 व्या शतकामध्ये भारत, जपान, ऑस्ट्रेलिया, ब्राझील, दक्षिण आफ्रिका, कॅनडा, इटली आणि दक्षिण कोरिया या राष्ट्रांनी देखील आपल्या राष्ट्राचे भौगोलिक महत्वानुसार वैज्ञानिक, आर्थिक व बाजारपेठीय विकास घडवून एकध्रुवीय विष्वव्यवस्थेसमोर एक आव्हान म्हणून उभे झाले. ही राश्ट्रे सत्ता संघर्श आणि षक्ती संतुलनामध्ये आपापल्या राश्ट्राना महत्व प्राप्त करून आपले राश्ट्रीय हित समोर ठेवून वैष्विक व्यवस्था निर्माण करायला भाग ठरतात. ज्यांचे मूल्यांकन करणे महत्वाचे वाटते.

भारताची गरज ही बहुध्रुवीय विश्वामध्ये आर्थिक संरक्षण, राष्ट्रीय संरक्षण, व्यापारीक व्यवहार, अमेरिका व रशिया यांसारख्या एका दुसऱ्या प्रती विरोधात्मक विचारधारा षक्ती प्राप्त राष्ट्राबरोबर कशा पद्धतीने भारताचे राजकीय संबंध आहेत यावर लक्ष केंद्रित करणे महत्त्वाचे वाटते? बहुध्रुवीय विश्वव्यवस्थेमध्ये भारत राष्ट्रीय संरक्षणात्मक वस्तू जसे की षस्त्रे हे पारंपारिक राष्ट्र रशियाबरोबरच अमेरिका, फ्रान्स सोबतच जर्मन व इटलीबरोबर संरक्षण क्षेत्रामध्ये व्यवहार करतांनी दिसून येते. ज्यांचे मूल्यांकन अत्यत महत्त्वाचे ठरते? बहुध्रुवीकरण विश्व व्यवस्थेमध्ये भारत आपल्या राष्ट्राचे परराष्ट्रीय धोरण आखत असताना इतर राष्ट्रांबरोबर होत असलेल्या व्यवहारातून कुठल्याही दबाव तंत्राचा प्रभाव भारताच्या सार्वभौमत्वावर पडतो की नाही याचे देखील मूल्यांकन करण्याचा महत्त्वाचे उद्देश आहे.






**मुख्य शब्द** – (वैश्विक प्रणाली मध्ये परीवर्तन, भारताचे परराष्ट्र धोरण, बहुध्रुवीय विश्वव्यवस्थेमध्ये भारताची भूमिका, राष्ट्रीय सुरक्षा संबंधित धोरणे, आर्थिक धोरण, भारताच्या समोरील धोरणात्मक आव्हाने)

**प्रस्तावना –**

बहुध्रुवीय विश्व व्यवस्थेच्या स्वरूपामध्ये राष्ट्रीय महत्त्व व शक्ती प्राप्त असलेले राष्ट्रे एक–दुसऱ्याबरोबर शक्ती संतुलनसाठी संघर्ष करीत असल्याचे दिसून येते. यामध्ये एक – दुसरे राष्ट्रे आप– आपसात राजकीय संबंध, संरक्षण व तंत्रज्ञान क्षेत्रात परस्पर व्यापार व्यवहार करत असतात. आर्थिक क्षेत्रात देखील मोठ्या प्रमाणावर उलाढाल करीत असतात ही सगळे व्यवहार राष्ट्रीय हित व गरज यांना अनुसरून होत असल्याचे जाणवते. भारताचे विविध राष्ट्रांबरोबर सकारात्मक किंवा नकारात्मक संबंध असले तरी संबंधित राष्ट्रांबरोबर वास्तवादी धोरणाच्या माध्यमातून व्यवहार होत असतो. हे राष्ट्रीय हित व संरक्षण यांना महत्त्व देऊन धोरणांची आखणी करण्यात आले आहे. ते. बहुध्रुवीय विश्व व्यवस्थामध्ये आदर्शवादी तत्वांचा तुलनेत यथार्थवादी धोरणांची भूमिका अधीक महत्वाची ठरतांनी दिसून येते.

बहुध्रुवीय विश्वव्यवस्था निर्माण होण्याअगोदर अनेक प्रकारच्या वेगवेगळ्या सत्तेचा उदय व विसर्जन झालेला आहे. बहुध्रुवीय विश्वव्यवस्था ही आंतरराष्ट्रीय क्षेत्रामध्ये अशी व्यवस्था आहे की ज्यामध्ये सत्ता आणि राष्ट्रीय प्रभाव अधिक राष्ट्रांमध्ये विभागलेली आहे आणि शक्ती संतुलनाचे केंद्र हे अनेक राष्ट्रांमध्ये विभाजित झाले आहे. त्यामध्ये फक्त एक किंवा दोन राष्ट्रांमध्येच शक्तीचे विभाजन होत नाही तर सत्तीचे केंद्रे, आकर्षण आणि महत्वामुळे अनेक राष्ट्रांमध्ये वेगवेगळ्या भौगोलिक, किंवा अन्य क्षेत्रामध्ये शक्तीचे विकेंद्रीकरण झालेले असते जी बहुध्रुवीय विश्व व्यवस्थेच्या विशेषतः एकापेक्षा अधिक शक्तीचे केन्द्र  जगामध्ये समोर येतात.

ज्या राश्ट्राजवळ राजनैतिक, आर्थिक, कुटनितीक, राजनय,उ तंत्रज्ञानिक विकास आणि सैनिक घटक ही महत्वपूर्ण शक्ती प्रभाव आहेत ही राष्ट्रे षक्ती संपत्र राष्ट्र माणून प्रभावी असतात. यामध्ये अमेरिका या देषाबरोबर रशिया, फ्रान्स, जर्मन, ब्रिटन, चीन, भारत, इजराइल, ब्राझील, ऑस्ट्रेलिया व कॅानेडा ही राष्ट्रे देखील शक्ति संतुलन व सत्ता संघर्ष च्या माध्यमातून बहुध्रुवीय व्यवस्थेच्या अस्तित्वात सहभागी होतात. यामध्ये वैष्वीक व्यक्तीचे विकेंद्रीकरण झाले असते.

बहुध्रुवीय व्यवस्थेमध्ये विविध राष्ट्र आंतरराष्ट्रीय स्तरावर गटबंधन बनवितात. एक–दूसऱ्या राष्ट्राला सहकार्य करतात. जी ही अगोदरच्या गटवादी व्यवस्पेपेक्षा खूप वेगळी राजनीतीक व्यवस्था आहे. ज्यामध्ये भारत देखील राष्ट्रीय हिताला महत्त्व देऊन इतर राष्ट्राप्रती राजनीतिक संबंध ठेवतांनी व्यवहारिक भूमिका घेत असल्याचे लक्षात येतो. बहुध्रुवीय विश्वव्यवस्थेमध्ये सहभागी राष्ट्रामध्ये व्यापारीक व्यवस्था, सुरक्षा व्यवस्था दहशतवादी विरोधी कारवाई आणि अन्य संकट कमी करण्यासाठी एकत्रितपणे कार्य करण्यावर भर देतात ज्यामुळे विकास व्यवस्थेमध्ये सहकार्य होत असल्याचे निदर्शनास येतो. भारत हा युक्रेन–रषीया युद्धादरम्यान अमेरिका किंवा युरोप यांच्या धोरणापासून प्रभावीत होऊन रषिया विरूद्ध कुठल्याही प्रकारचा प्रचारात सहभागी झालेला नाही आहे. जे भरताचे सार्वभौमीक स्वातंत्र्याचे प्रतीक समझता येईल.

ब्रहुध्रुवीय विश्वव्यवस्थेमध्ये विकसनशील राष्ट्र आणि लहान राष्ट्राची भागीदारी संबंधांमध्ये व्यासपीठ सतत वाढत असल्याचे जाणवते. भारत आपल्या धोरणांच्या हित संबंधीत माध्यमातून नवीन संगठन निर्माण करण्यासाठी सहभाग घेत असतो. जसे की ब्रिक्स अंतर्गत ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिका यासारखे राष्ट्रांचे एक संघटन आहे. क्वाड व आशिया – प्रशांत क्षेत्र याद्वारे भारत, ऑस्ट्रेलिपा, जपान आणि संयुक्त राज्य अमेरिका यांच्यामधील परस्पर अंतर सरकारी सहयोग ही बहुध्रुवीय विश्वव्यवस्थेचे उदाहरण आहे. बहुध्रुवीय व्यवस्थेची सुरुवात 21 व्या शतकामध्ये अमेरिकेच्या एक ध्रुवीय सत्तेला आव्हान देत झालेला आहे. यामध्ये भारत एक परमाणुशक्ती संपन्न राष्ट्र आणि आर्थिक विकास सोबतच भारताचा भारतीय लोकसंख्या मुळे बाजारपेठेचा झालेला विकास ह्या गोष्टींच्या आधारावर भारत पसराष्ट्रीय धोरण ठरवितांनी राष्ट्रीय हित आणि सता संतुलन साठी प्रयत्न करीत आहे. त्याचबरोबर राष्ट्रीय विकास वाढविण्यासाठी विकसित व विकसनशील राष्ट्राबरोबर राजकीय सबंधावरून ध्येय धोरणे ठरवित आहे. भारत आपले परराश्ट्रीय धोरण ठरवितांनी राश्ट्राच्या सार्वभौमत्वाचा विचार करता भरत स्वातंत्र्यापासुन वर्तमान काळापर्यंत कोणत्याही वैष्वीक महाषक्तीचा दबावाच्या आहारी गेलेला नाही असे लक्षात येते.

**ऐतिशसिक पार्श्वभूमी –**

बहुध्रुवीय विश्वव्यवस्था निर्माण होण्याअगोदर 20 व्या शतकात प्रथम विश्व युद्धामध्ये सहभागी युरोपीय राष्ट्र इंग्लंड, फ्रान्स, जपान, जर्मन व रशिया ही राष्ट्रे राष्ट्रसंघाचे माध्यमातून वैश्विक संघर्ष टाळण्यासाठी कार्य करतात जी ही शक्ती संतुलनाचाच भाग असल्याने जाणवते. पण हे कार्य यशस्वीपणे पूर्ण होण्याअगोदर द्वितीय विष्व महायुद्धाची सुरुवात झालेली असते. यानंतर वर्ष 1945 ला विजय राष्ट्राद्वारे विचारधाराच्या आधारावर दोन वेगवेगळे गटामध्ये वैश्विक षक्ती प्राप्त राष्ट्राद्वारे विभाजन झाले, जे द्विध्रुवीय व्यवस्था निर्माण होऊन शीत युद्धाच्या स्वरूपात अस्तित्वाला आले होते. ज्याचे नेतृत्व वेगवेगळे स्थानानुसार सोवियत संघ रशिया आणि संयुक्त राज्य अमेरिका या दोन्ही राष्ट्रांच्या नेतृत्वाखाली दोन वेगवेगळे गट तयार झाले. ज्यामुळे संपूर्ण जगात युद्धजन्य स्थिती व भीतीचे वातावरण निर्माण झाल्याचे दिसून येते. वर्ष 1989 मध्ये जर्मनीचे एकीकरण आणि वर्श 1990 मध्ये सोवियत संघ रशियाचे 15 ते 16 राष्ट्रांमध्ये विभाजन झाले ज्यामुळे सोवियत संघ रषिया गट पराजित ठरला आणि यशस्वी गट म्हणून अमेरिका एक शक्ती संपत्र राष्ट्र म्हणून समोर आले. पुढे अमेरिका हा जवळ – जवळ एक दशक एक ध्रुवीय विश्वव्यवस्था म्हणून ओळखल्या गेला होता. भारताचे एक ध्रुवीय विश्वव्यवस्थेमध्ये रशिया बरोबर संबंध हे थोडे कमी झालेले होते. खाडीयुद्धामुळे भारताची आर्थिक स्थिती कमजोर पडली, ज्यामुळे भारत वर्ष 1991 मध्ये उदारीकरण, जागतिकीकरण आणि खाजगीकरण यांच्या माध्यमातून च्च् मॉडल जे सार्वजनिक, खाजगी आणि संयुक्त तत्त्वावर आर्थिक धोरण ठरवितात जे राष्ट्राच्या हितासाठी आणि राष्ट्रीय आर्थिक संरक्षणासाठी महत्त्वाचे ठरल्याचे जाणवते. वर्ष 1997–98 पासूनच या एक ध्रुवीय विश्वावस्थेमध्ये अमेरिकेला आव्हान देणारे वेगवेगळे राष्ट्र, स्थानीय व भौगोलिक क्षेत्रात गुंतवणुक, बाजारपेठचे विकास, तंत्रज्ञानिक विकास व जागतिक स्तरावर वस्तूंची निर्यातदार कारखाना अशी ओळख मिळवत सोबतच हरित ऊर्जेचे समृद्ध साठे, इंधन तेल यांच्या आधारावर एकध्रुवीय षक्ती व्यवस्थेला आवानात्मक सत्ती संपत्र राश्ट्र म्हणून समोर आले. ज्यामुळे 21 व्या शतकामध्ये एकध्रुवीप विश्वव्यवस्थेला आव्हाण निर्माण करणारे ठरत बहुध्रुवीय विश्वव्यवस्थेची सुरुवात झाली. भारत बहुध्रुवीध विश्वव्यवस्थामध्ये यथार्थवादी धोरणांचा अवलंबन करीत असतो जे सत्ता सनतुलांनाच्या स्पर्धेत सहभागी होऊन राश्ट्रहिताला महत्व देत स्पर्धक राश्ट्रांबरोबर राजकीय, संरक्षण व राश्ट्रीय संरक्षण संबंधीत व आर्थिक क्षेत्रात पारस्परिक व्यवहार करीत असल्याचे निदर्षनास आले आहे.

**उद्देष –**

1) 'बहुध्रुवीय विष्व व्यवस्थेमध्ये भारताद्वारे राश्ट्रीय हिताला महत्व देऊन आपले परराश्ट्रीय धोरणांतर्गत संबंधित राश्ट्राबरोबर मित्रत्वाचे व सहकार्याचे संबंध निर्माण करणे.

2) भारताद्वारे घेण्यात येणाऱ्या भूमिकेचे वैष्विक स्तरावर अन्य राश्ट्र बरोबर षक्ति संतुलनामध्ये दाखल घेता राश्ट्राला महत्व प्राप्त करून देणे व राश्ट्रीय सार्वभौमत्व अबाधित ठेवणे. .

**महत्व –**


भारताचे परराश्ट्रीय धोरण हे राश्ट्राचे स्वातंत्र्य व सार्वभौमत्व यावर कोणत्याही षक्ती संपन्न राश्ट्राद्वारे पूर्वीप्रमाणे प्रभावित होणार नाही. भारत आपले राश्ट्रीय हित साध्य करण्यास सक्षम राहील. ज्यामुळे बहुध्रुवीय विष्व व्यवस्थेमध्ये षक्ती सुंलनामध्ये भरताची महत्वाची भूमिका सिद्ध होईल.

**संशोधन पद्धती –**

या संशोधनांतर्गत संशोधन करीत असताना दुय्यम स्त्रोतांचा अवलंबन करण्यात आलेला आहे. ज्यामध्ये संबंधित विषयावर झालेले शोध प्रबंधन, करण्यात आलेले लिखाण, संबंधित साहित्य, वर्तमानपत्र या स्त्रोतांचा आधार घेण्यात आलेला आहे.

**साहित्याचा आढावा –**

**जयशंकर एस., (अनु) शिवेन सुजाता**






जयशकर एस. यांच्या विश्वबंधु भारत (2024) रुपा पब्लिकेशन इंडिया प्रा. लीमीटेड 7/11, अंसारी रोड दरीयागंज नवी दिल्ली. 110002 या पुस्तकामध्ये भारताने 21 व्या शतकात राष्ट्रीय विकासासाठी महाशक्ती प्राप्त व औद्योगिक विकसित राष्ट्राबरोबर गतिशील पणे कार्य करायला सुरुवात केली आणि ही जे धोरणे आहेत या धोरणांना 20 व्या शतकामध्ये राबवायला सुरुवात केली असती तर भारताचा विकास अधिक गतिमान असता असे सांगण्याचे प्रयत्न केलेले आहे. वर्ष 2020 नंतर भारत आणि चीन मधील उद्‌भवलेल्या सीमा भांडणामुळे या दोन्ही देशांमध्ये स्थिर संतुलन संबंध स्थापित करणे कठिण झालेले आहेत. सोबतच भारत बहुध्रुवीय विश्वव्यवस्थेसोबत सत्ता संघर्ष मध्ये भाग घेत असल्याचे मत व्यक्त करीत आहे.

**प्रो. फाळीया बी. एल.**

प्रो. फाळीया यांच्या आंतरराष्ट्रीय राजनीति, (2024), साहित्य भवन प्रकाशन, सी 17, साईट सी सिकंदरा औद्योगिक क्षेत्र आग्रा 282007 (ऊ. प्र.) प्रकाशित या पुस्तकामध्ये भारताचे गुटनिरपेक्ष धोरण वर्श 1991 नंतर भारताचे उदारीकरण, जागतिकीकरण व खाजगीकरण या माध्यमातून वैश्विक व्यवस्थेमध्ये आखलेले धोरणे त्याचबरोबर भारताद्वारे 21 व्या शतकामध्ये संपूर्ण विश्वव्यवस्थेमध्ये होत असलेल्या उलाढालीचा उल्लेख आणि शक्ती संपन्न राष्ट्राबरोबर होत असलेल्या व्यवहाराचा उल्लेख यामध्ये परण्यात आलेला आहे.

**बसू रूमकी –**

बसू यांच्या आंतरराष्ट्रीय राजकारण संकल्पना, सिद्धांत आणि समस्या (2017) प्रथम आवृती सेज प्रकाशन इंडिया प्रा. लिमिटेड, गुरूग्राम, हरियाना, 122002 प्रकाशित झालेल्या पुस्तकामध्ये लेखकांनी राष्ट्रीय हितसंबंध आणि परराष्ट्र धोरण, आणवस्त्र प्रसार व सता संतुलन याबाबत पुस्तकांमध्ये सांगितलेले आहे जे या पत्रिकेत दिशा देण्यास महत्वाचे ठरत आहे.

**सीकरी राजीव –**


सीकरी, यांच्या भारताचे परराष्ट्र धोरणाचा पुनर्विचार आव्हाने आणि नीती (2017) सेज प्रकाशन इंडिया प्रा. लिमिटेड ठ1ध्1 मोहन को ऑपरेटिव इंडस्ट्रियल एरिया मथुरा रोड नवी दिल्ली. 110044, या पुस्तकामध्ये प्रत्येक राष्ट्र आपले हित जपण्याकरिता हित संबंधांना पुढे नेण्याकरिता मुत्सद्दीपणा आधारावर संपन्न देश तसेच जे आपा–आपल्या राष्ट्रीय हिताला महत्व देण्यासाठी कार्य करतात त्यांच्याबरोबर शिथील व समन्वयात्मक धोरणे तयार करून व्यवहारात आणण्यावर भर देतात. ज्यामध्ये राष्ट्राला महत्त्वाची भूमिका बजावणे अत्यंत आवश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात आलेले आहे.

**वैश्विक प्रणालीमध्ये परिवर्तन –**

द्वितीय विष्व युद्धानंतर विष्व कल्याण आणि वैष्वीक नियंत्रणाच्या दृष्टिकोनातून स्थापित झालेल्या आतरराष्ट्रीय संघटना, संयुक्त राष्ट्र संघटना, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि विष्व बँक या संस्था आपल्या कठोर धोरणामुळे आज भूराजनीतीक क्षेत्र संबंधित कमकुवत व कमी प्रसंगीक वाटतात. 20 व्या षतकाच्या अंतिम दशकामध्ये ही पोकळी भरून काढण्यासाठी अनेक राष्ट्रांनी क्षेत्रीय स्तरावर विविध संघटना स्थापित करायला सुरुवात केली जी बहुध्रुवीय विश्वव्यवस्था निर्माण करण्यासाठी सुद्धा कारणीभूत ठरली. आज 21 व्या शतकामध्ये क्षेत्रीय संघठना ज्यात ब्रिक्स संघठना, संघाई सहयोग संघटना, न्यू डेवलोपमेंट बँक आणि क्वाड यासारख्या संघटनेचा उदय झालेला दिसत आहे. विश्व हे कठीण गटाच्या तुलनेत लवचिक गट असलेल्या मंचाकडे आकर्षित होत आहे. ज्यामध्ये अन्य राष्ट्रप्रमाणे भारत हा आपल्या राष्ट्रीय हितांना महत्त्व देऊन परराष्ट्रीय धोरण ठरवीत असतो.

**बहुध्रुवीय विष्वव्यवस्था –**

बहुध्रुविय विष्वव्यवस्था ही अशी व्यवस्था आहे की ज्यामध्ये वैश्विक धोरणांना आकार देण्यात फक्त एक किंवा दोनच राष्ट्राचा सहभाग नसून अनेक शक्तिशाली राष्ट्रांचा समावेश असतो. बहुध्रुविय विश्वव्यवस्था ही शीतयुद्धाच्या काळातील द्विध्रुविय व्यवस्था आणि शीतयुद्ध नंतरचे एक ध्रुवीय विश्वव्यवस्था यांच्या एकाधिकारशाही व्यवस्थेला आव्हान करीत असतो. आज अनेक राष्ट्र आपले राष्ट्रीय हित व संरक्षण आणि विकासात्मक मूल्यांच्या आधारावर लवचिक व्यवस्था असलेल्या






राष्ट्राबरोबर गटबंधन बनविताना दिसतात. ज्यामुळे अस्तित्वात असलेल्या वैश्विक शक्ती प्राप्त राष्ट्रांचा शक्ती केंद्रीयकरणामध्ये महत्त्व कमी होत आहे. बहुध्रुवीय विश्वव्यवस्था ही शक्ति संतुलनासाठी सत्ता संघर्ष करतानी दिसत आहे.

**बहुध्रुविय विष्व व्यवस्थेमध्ये भारताची भूमिका –**

भारत वर्ष 1991 पासून जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरण या धोरणांचा स्वीकार करून राष्ट्रीय विकासाला गती देण्यासाठी प्रयत्नशील आहे. 21 व्या शतकात आदर्ष नीती आणि गैरसलग्नता धोरणांच्या ठिकाणी व्यवहारिकतावादी व वास्तववादी धोरणाचा स्वीकार करत आहे. या ठिकाणी भारत हा हिंद–प्रशांत क्षेत्राच्या माध्यमातून पश्चिमात्य राष्ट्राबरोबर युवतीचा हिस्सा आहे तर त्याच बरोबर संघाई सहकार्य संघटन आणि ब्रिक्स यासारख्या युरोशियन मंचाच्या मध्यमातून देखील भारत सक्रिय सहभागी आहे. ब्रिक्स या संघटनाची स्थापना वर्ष 2009 मध्ये झाले ज्याचे भारत संस्थापक सदस्य देष आहे. संघाई सहकार्य संघटनाची स्थापना वर्ष 2001 मध्ये झाली असून भारत या संघटनेचे वर्ष 2017 मध्ये सदस्य झाले या अगोदर भारत संघाई सहकार्य संघटनेचा पर्यवेक्षक वार्ता भागीदार राष्ट्र म्हणून कार्यशील होते. 21 व्या शतकाच्या सुरुवातीच्या दशकापासून आणि डॉ. मनमोहन सिंग यांच्या कार्यकाळामध्ये क्वाड (फूंक) स्थापनेसाठी पुढाकार घेण्यात आला होता पण वर्ष 2017 मध्ये क्वाडच्या स्थापनेला मूर्त स्वरूप प्राप्त झाले. ए2न2 यांची देखील स्थापना झालेली आहे. वर्तमान काळामध्ये भारत यांच्यासारख्या मंचाच्या माध्यमातून राष्ट्रीय हित साध्य करण्यासाठी महत्वाची भूमिका पार पाडत आहे आशिया खंडामधे शक्ती संतुलन निर्माण करत बहुध्रुवीय विश्वव्यवस्थेला गती प्रदान करत आहे जे भारताच्या हितासाठी आवश्यक धोरणात्मक भूमिका आहे.

**राष्ट्रीय सुरक्षा संबंधित धोरणे –**

भारत स्वतंत्र झाल्यापासून राष्ट्राचा सार्वभौमत्व अबाधित राहावे यासाठी स्वतंत्र राष्ट्रीय धोरण ठरविण्यावर भर देतो. शीत युद्ध काळामध्ये राष्ट्राच्या संरक्षणासाठी गुटनिरपेक्ष मार्ग निवडण्यावर भर दिला. जेणेकरून कोणत्याही राष्ट्र बरोबर शत्रुत्व राहणार नाही. वर्ष 1948 मध्ये भारत व पाकिस्तान युद्ध काश्मीर मुद्द्यावर झाले. तर वर्ष 1962 मध्ये चीनद्वारे करण्यात आलेल्या आक्रमणावेळी राष्ट्रीय सीमा सुरक्षा महत्वाची वाटली. भारताच्या गुटनिरपेक्ष धोरणामुळे नाटो (छ।ज्) गटातील राष्ट्र अमेरिका, जर्मन, ब्रिटन यांनी सैन्य मदत तर सोवियत संघ गटातून रशिया यांनी भारताला संरक्षण सामग्री देण्याची आणि भारतात मिग लढाऊ विमान निर्माण करण्यास सहायता करण्याची तयारी दर्शवली. वर्ष 1971 मध्ये भारताने राष्ट्रीय संरक्षणासाठी पाकिस्तान बरोबर युद्ध केले. पाकिस्तानच्या बाजूने युद्धामध्ये अमेरिका आणि चीन यानी मदत करण्याचे ठरविताच भारताने या राष्ट्र विरोधात सोवियत संघ रशिया बरोबर मैत्री करार केले ज्यामुळे भारताला लष्करी व सैन्य मदत करण्याचे ठरले होते. भारताने राष्ट्राच्या सरक्षणाला महत्व देत वर्ष 1973 ते 1974 मध्ये आण्विक परीक्षण घडविले. सोबतच 21 व्या शतकामध्ये प्रवेश करण्याअगोदर वर्ष 1998–99 ला आण्विक परीक्षण करण्यात आले. त्यावेळेला विएतनाम व रशिया यांसारख्या राष्ट्रांनी भारतद्वारे करण्यात आलेले आण्विक परीक्षण हे भारताच्या संरक्षणासाठी आवश्यक असल्याचे मत व्यक्त करत भाराताप्रति समर्थन दर्शविल्याचे जाणवते. भारत हा दहशतवादी विरोधी मुद्दे संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सभेमध्ये वेळोवेळी उपस्थित करीत असतो. ज्याची दखल जागतिक स्तरावर अनेक राष्ट्राकडून घेण्यात येत असते. भारत संरक्षण क्षेत्रामध्ये रशिया या राष्ट्राकडून मोठ्या प्रमाणावर इंधन सामग्री व संरक्षण सामग्रीची आयात करतो. भारताने राष्ट्रीय संरक्षणाचा बाबतीत कोणत्याही एका राष्ट्रावर अवलंबित्व कमी करण्यासाठी व खुल्या बाजारपेठेचा महत्व घडवून आणण्यासाठी अमेरिका, फ्रान्स, जर्मन आणि इजराइल या राष्ट्राकडून सुद्धा संरक्षण सामग्री व तंत्रज्ञानाची आयात करतो. याचबरोबर भारताने संरक्षण क्षेत्रामध्ये इतर राष्ट्रावर अवलंबित्व कमी करण्यासाठी तंत्रज्ञान विकसित राष्ट्र बरोबर मिळून देषांतर्गत शस्त्र सामग्री निर्माण करण्यावर लक्ष केंद्रित करत आहे. भारत बहुध्रुविय वैश्विकारणामध्ये स्वयंपूर्ण आत्मनिर्भर बनण्याचे ध्येय ठेवतो आहे. भारत आपले राश्ट्रीय हित साध्य करण्यासाठी आंतरराश्ट्रीय स्तरावर आपल्या परराश्ट्रीय धोरणांतर्गत षक्तीसंपन्न राश्ट्राबरोबर मित्रत्व संबंध वाढविण्यावर भर देतो. ज्यामुळे भारताला आंतरराश्ट्रीय स्तरावर सहकार्य प्राप्त करण्यासाठी मीत्र राश्ट्र असेल.

**आर्थिक धोरण –**


भारताचे आंतरराष्ट्रीय स्तरावर आर्थिक धोरणे गुटनिरपेक्ष तत्वाच्या आधारावर होते. ज्यामध्ये शीत युद्धकाळात दोन्ही गटाकडून मदत मिळवून आर्थिक विकास करणे व राश्ट्राला कोणत्याही गटात सहभागी न करून घेता राष्ट्राच्या आर्थिक

विकासाला अडथळा निर्माण होणार नाही, याची काळजी घेतली गेली. भारताला फ्रान्स, अमेरिका तसेच सोवियत संघ रशिया यानी औद्योगिक व लोह पोलाद कारखाने स्थापित करण्यास मदत केल्याचे जाणवते. वर्ष 1971 मध्ये भारत–पाकिस्तान युद्धानंतर नाटो गटातील अनेक राष्ट्रांनी भारतावर आर्थिक निबंध लादले. त्यावेळी भारताने सोवियत संघ रशिया व अन्य राष्ट्र बरोबर वस्तुच्या विनिमय पद्धती द्वारे आर्थिक व्यवहार करण्याचे धोरण ठरविले. शीत युद्धानंतर भारताने राष्ट्रीय विकास घडवून आणण्यासाठी वर्ष 1991 ला मुक्त बाजारपेठ करण्यावर भर दिल्याचे लक्षात येते. तत्कालीन भारतीय अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांनी उदारीकरण खाजगीकरण व जागतिकीकरणाच्या माध्यमातून जगातील संपूर्ण राष्ट्रासाठी भारतीय बाजारपेठेचे दरवाजे मोकळे केले. जेणेकरून राष्ट्राचा आर्थिक संकट नष्ट करून राष्ट्रीय आर्थिक विकासाला गती प्राप्त करण्याचे उद्देष होते. 20 व्या शतकाच्या अंतापासून जागतीक व्यवस्था ही बहुध्रुवीय विश्वव्यवस्थेकडे वळली. यामध्ये प्रत्येक राष्ट्र आपल्या राष्ट्रीय हिताना स्वतंत्रपणे महत्त्व द्यायला लागले आहे. 21 व्या शतकामध्ये क्षेत्रीय भौगोलिक महत्व, तंत्रज्ञानिक विकास, नैसर्गिक ऊर्जेचा शोध, बाजारपेठेचा वाढता मोठा आकार या आधारावर विविध राष्ट्रांना महत्व प्राप्त झाले, ज्यामध्ये सत्ता संघर्ष व आर्थिक विकास यांना महत्व प्राप्त झाला. आहे. भारताचे पंतप्रधान म्हणून डॉ. सिंग यांनी अमेरिका, ब्रिटन, जर्मन, जपान या राष्ट्रांची भेट घेऊन आर्थिक गुंतवणूक वाढविण्यावर भर दिले ज्यामुळे आर्थिक विकासाकडे लक्ष केंद्रित झाले ज्याचे उत्तम उदाहरण हे वर्ष 2008 मध्ये उद्‌भवलेल्या जागतिक आर्थिक महामंदीवेळी भारत सुस्थिरपणे आर्थिक लक्ष्य साधत असल्याचे दिसून येते., जगाचा कारखाना म्हणून उदयास आलेल्या शेजारील राष्ट्र चीन यांच्याबरोबर देखील संबंधांना सुधारण्यावर लक्ष केंद्रित केले. आहे. वर्ष 2022 पर्यंत भारत राष्ट्रीय हित लक्षात ठेवून आर्थिक परराष्ट्रीय धोरण ठरवितानी आपल्या निदर्शनास येत आहे. जे बहुध्रुवीय विश्व व्यवस्थेमधे भारताची वाढलेली बाजारपेठ, तंत्रज्ञान कौशल्य व आर्थिक विकास या आधारावर भारत महत्वाच्या भूमिकेत विकसीत राष्ट्रांबरोबर जी–20, ब्रिक्स, क्वॉड, संघाई सहयोग संघटन, प्वै।ए वसेनार संगठन, आसियान प्रशांत क्षेत्र यासारख्या संघटनेच्या मंचामध्ये सहभागी झालेला आहे. भारताचे या विविध संघठन व इतर राश्ट्राबरोबर पारंपारिक संबंध आणि भारताची वाढत चाललेले महत्व यामध्ये भारत परराश्ट्रीय धोरणांतर्गत आपले स्वातंत्र्य धोरण ठरवितो आणि राश्ट्रीय हिताला महत्व देतो.

**भारता समोरील धारेणात्मक आव्हाने –**

भारत हा 21 व्या षतकामध्ये आतंरराश्ट्रीय स्तरावर स्वतःला सक्ती संपन्न राश्ट्र बनविण्यावर भर देतो. वैष्वीकरणाच्या धोरणांतर्गत राश्ट्र – राश्ट्रातील विचार प्रणाली आणि आंतरराश्ट्रीय धोरण ही परिवर्तनषील आहे. जे वेळ, काळ व राश्ट्रीयहित महत्व यानुसार बदलत राहते. भारत हा राश्ट्रीय संरक्षण व आर्थिक विकास यांना महत्व देत षीत युद्धकाळात मोठयाप्रमाणावर षस्त्रांसाठी सोवीयत संघ रषिया बरोबर व्यवहार करायचा पण वर्तमानकाळामध्ये म्हणजे 21 व्या षतकामध्ये राश्ट्रीय संरक्षण संबंधीत कोणत्याही एका राश्ट्रावर अवलंबून न राहता इतर अन्य राश्ट्राबरोबर षस्त्रांची व ससस्त्र तंत्रज्ञानाची आयात करण्यावर भर देत आहे. ज्यामध्ये अमेरिका, फ्रान्स, इज्राईल, जर्मन व इटली या राश्ट्राबरोबर व्यवहार करतांनी लक्षात येते. भारत राश्ट्रीय संरक्षणाअंतर्गत राश्ट्राच्या आर्थिक विकास व आवष्यक वस्तुंची आयात – निर्यात करण्यावर भर देतो. ज्यामध्ये भारत – अमेरिका या राश्ट्राबरोबर करीत असलेला आर्थिक व्यापार संबंधामध्ये लाभाच्या स्थानी आहे व भारताचे सर्वात जास्त व्यापार हा 2024 पर्यंत अमेरिका या राश्ट्राबरोबर होता. भारत हा कच्चा इंधन, पेट्रोलियम तेल, इलेक्ट्रॉनिक वस्तु, इंजीनिअरींग पार्ट आणि हिरे यांच्या माध्यमातून रषिया, चीन, फ्रान्स, जपान, इज्राईल, सऊदी अरब, इरान व दक्षिण कोरिया, ऑस्टेलिया या राश्ट्राबरोबर व्यवहार करीत असतो. पण भारत या राश्ट्राबरोबर होत असलेल्या व्यापारामध्ये तोटयाच्या स्थानी म्हणजे नकारात्मक स्वरूपात आहे. जे बहुध्रुवीय विष्व व्यवस्थेमध्ये भारतासमोर एक आर्थिक आव्हान उभे करत आहे.

रशिया – युक्रेन युद्ध याची सुरवात वर्श 2022 मध्ये झाली व इज्राईल आणि फिलीस्तीनमधील गाझा क्षेत्रात उद्‌भवणारे युद्ध ज्यामुळे भारतावर अमेरिका, युरोप व रषीया, चीन या दोन गटाद्वारे वैष्वीक स्तरावर व्यवहार करतांनी अप्रत्यक्षपणे दबावतंत्राचे आव्हान उद्‌भवत आहे. सोबत भारताच्या षेजारील राश्ट्राची राजकीय अस्थीरता व आर्थिक स्थिती जी दक्षिण आषीयाई राश्ट्रामध्ये संकट उत्पन्न करीत आहे. ज्यामुळे भारताला वैष्वीक स्तरावरील आपले अस्तीत्व निर्माण करणे संघर्शाचे ठरत आहे.






**निश्कर्श –**

बहुध्रुवीय विष्व व्यवस्थेमध्ये विकसीत व भौगोलिक महत्व प्राप्त राश्ट्रानी भाग घेतले हि राश्ट्रे वैष्वीक हितापेक्षा राश्ट्रीय हितांना आणि राश्ट्रीय सार्वभौमत्व व सरंक्षन यांना वैष्वीक राजनीतीमध्ये महत्व देण्याचे धोरण अवलंबविले आहे. भारत हा नैतीक विचारधारा व यथार्थवाद यांच्यात योग्य जुळवाजुळव करून राश्ट्रीय हित साधण्यावर भर देत असतो. वर्श 1991 नंतर भारताचे राश्ट्रीय व आंतरराश्ट्रीय स्तरावर महत्व वाढविण्यासाठी पारंपारिक धोरणामध्ये बदल करून नव्याने धोरणाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. राश्ट्रीय बाजारपेठेचा विस्तार करण्यात सुरवात झालेली आहे. वर्श 1998 मध्ये वैष्वीक षक्ती प्राप्त राश्ट्रांना न जुमानता पोखरण मध्ये आण्विक परमाणु परिक्षण घडविले जे राश्ट्राच्या सुरक्षामध्ये भर घालते. डॉ. मनमोहन सिंह यांनी आपल्या पंतप्रधान कार्यकाळात वैष्विक स्तरावर अमेरिका, फ्रान्स व अन्य युरोपियन राश्ट्राबरोबर नागरीक आण्विक करार घडवून आणले. या बरोबर 21 व्या षतकामध्ये निर्माण झालेल्या बहुध्रुवीय विष्व व्यवस्थेमध्ये भारताला महत्व प्राप्त होण्यास मदत झाले. भारत वैष्वीक स्थरावर मत व्यक्त करतांनी राश्ट्रीय हित संरक्षण व आर्थिक विकास यावर लक्ष केंद्रीत करून षक्ती संतुलनांसाठी सत्ता संघर्शामध्ये सहभागी झाले आहे. भारत आषियाई बहुध्रुवीय व्यवस्थेमध्ये हिंद – प्रषांत क्षेत्र व षेजारील राश्ट्रांच्या आधारावर चीन या राश्ट्राबरोबर सत्ता संघर्शामध्ये सहभागी आहे. भारतासमोर चीन व पाकीस्तान या दोन राश्ट्राबरोबर वेळोवेळी उद्‌भवनारे राश्ट्रीय सीमा प्रष्न, दहषतवादी मुद्दे या तत्वावर आव्हान दिसतात. भारत या प्रष्नावर तोडगा काढत अमेरिका, ऑस्ट्रेलिया, रषीया, चीन, फ्रान्स, जर्मन, ब्रिटेन व जपान यासारख्या राश्ट्राबरोबर आर्थिक व संरक्षण क्षेत्रात व्यवहार करीत असतो व सत्ता संघर्श सहभागी होतांना दिसतो.

**संदर्भग्रंथ सूची –**


1. जयषंकर एस. (अनु.) षिवेन सुजाता (2024), विष्वबन्धु भारत, रूपा पब्लीकेषन, इण्डिया प्रा. लि. 1/6, अंसारी रोड, दरीयागंज, नवी दिल्ली 110002
2. प्रो. फाडीया बी. एल., (2014), आन्तरराश्ट्रीय राजनीती साहित्य भवन प्रकाषन, सी 17, साईट सी सीकंदरा औदयोगीक क्षेत्र आग्रा, 282007, (उ. प्र.)
3. बसु, रूमकी, (2016), आंतरराश्ट्रीय राजकारण, संकल्पना सिद्धांत आणि समस्या, प्रथम आवृत्ती षेज, प्रकाषन इण्डिया, प्रा. ली. मेहरौली गुडगाव रोड, सीकंदरपूर, सेक्टर गुरूग्राम हरियाना, 122002.
4. सीकीरी राजीव, (2017), भारताच्या परराश्ट्रीय धोरणाचे पूनर्विचार आव्हाने आणि निती, सेज प्रकाषन, इण्डीया प्रा. लि. ठष्ष्1ए मोहन कोऑपरेटिव इण्डस्ट्रीयल येरीया मथुरा, रोड, नवी दिल्ली, 110044.
5. बोधनकर सुधीर, अलोने विवके (2008), सामाजीक संषोधन पद्धती, श्री साईनाथ प्रकाषन, धरमपेठ, नागपूर 440001, महाराश्ट्र

**वर्तमानपत्र –**

- लोकसत्ता
- लोकमत